निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : १९७ वा.
शनिवार - २० सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## संक्षिप्त

### बांबू उद्योग वाढीसाठी नवीन तंत्रज्ञान व संशोधनावर भर देण्याची गरज व्यक्त..

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** बांबू उद्योगातील भविष्यातील संधींचा लाभ घेण्यासाठी समूह पद्धतीने बांबू उद्योग उभारावे लागतील. सक्षम बांबू धोरण त्यासाठी उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा बांबू उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ व उद्योजकांनी व्यक्त केल्या. त्याचबरोबर बांबू उद्योग वाढवायचा असेल तर राज्य शासनाचे सहकार्य, नवीन तंत्रज्ञान आणि स्थानिक परिस्थितीत उपयुक्त ठरणारी यंत्रे निर्माण करणे आवश्यक असून पुरवठा साखळी निर्माण करण्यावर भर द्यावा, असे मत बांबू परिषदेतील चर्चासत्रात व्यक्त करण्यात आले.

आंतरराष्ट्रीय बांबू दिनानिमित्त महाराष्ट्र सरकारच्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) व फिनिक्स फाऊंडेशन यांच्यामार्फत मुंबईत दोन दिवसांची बांबू परिषद झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पहिल्या दिवसाचा समारोप झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी आज 'बांबू क्षेत्रातील उद्योगांच्या संधी आणि आव्हाने' या विषयावर गोलमेज परिषद पार पडली. बांबू फॉर पीपल, प्लॅनेट अँड प्रॉस्पेरिटी : ग्रीन गोल्ड, ग्रीन एनर्जी, ग्रीन अर्थ अशी संकल्पना या परिषदेची आहे.

'बाबू क्षेत्रातील उद्योगांसाठी संधी आणि विकास' या विषयावरील चर्चासत्रात देशभरातली अभ्यासक, उद्योजक व तज्ज्ञांनी सहभाग घेतला. यावेळी मुख्यमंत्री शाश्वत विकास कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल, मालविका हर्बोफार्मा प्रा. लि.चे संचालक दिनेश शर्मा, आयटीसी कंपनीचे मुरलीधर मुत्नुरु, मुथ्था इंडस्ट्रीचे अनिल मुथ्था, रश्मी उद्योगाचे राजीव प्रताप सिंग, उद्योजक अनिल ओरस्कर, महाराष्ट्राचे मनरेगा आयुक्त नंद कुमार, बिट्स पिलानी आयटीचे प्राध्यापक अभिषेक गुप्ता, धनंजय बायोएनर्जीचे धनंजय कुंदकुरू, आयएसबी भारती इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक पॉलिसी संस्थेचे संदीप चौधरी, आदित्य गोळे यांच्यासह देशभरातील बांबू क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते.

श्री. शर्मा म्हणाले, आत्मनिर्भर भारत व्हायचा असेल तर देशाला जैवइंधनाकडे वळावे लागणार आहे. त्यामध्ये बांबू हा महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर बांबू लागवडीवर भर द्यायला हवा. देशातील ९० कोटी एकर पडीक जमिनीमध्ये बांबूची लागवड केली तर त्यापासून सध्या आयात होणारे दोन अब्ज बॅरल इंधन बंद होऊन आपण देशात सहा अब्ज बॅरल जैवइंधन तयार करू शकू. औद्योगिक, स्टील आधारित आणि सिलिकॉन क्रांतीनंतर आता भारताला जैवइंधनामध्ये क्रांती करून इंधन आयातदार देश ही प्रतिमा बदलून जगाला इंधन निर्यात करणारा देश अशी ओळख निर्माण करणे शक्य होणार आहे.

श्री. नंदकुमार यांनी बांबू उद्योग वाढीसाठी लागणाऱ्या विविध घटकांवर राज्य शासन काम करत आहे. यासाठी बांबू संरक्षण व व्यवस्थापन धोरणावर काम सुरू असल्याचे सांगितले.

बांबूसंदर्भात भारतात संशोधन व विकास मोठ्या प्रमाणात झाल्यास भारत हा बांबू उत्पादनामध्ये अग्रसेर होईल, असे श्री. ओरोस्कर यांनी सांगितले. त्याचबरोबर पुरवठा साखळी व बाजारपेठ निर्माण करण्यावरही भर देण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी सांगितली.

मुथ्था इंडस्ट्रीचे अनिल मुथ्था म्हणाले, बांबू उद्योगाला सुरुवातीच्या टप्प्यात सरकारी मदतीचे साह्य मिळाले पाहिजे. सरकारने खरेदीमध्ये बांबू फर्निचरला अधिक संधी देण्याची गरज आहे. बांबू उद्योगासाठी मशिनरी प्रामुख्याने चीनमध्ये मिळतात. परंतु स्थानिक पातळीवर देखील यंत्रांची निर्मिती झाली पाहिजे. तसेच दर्जेदार कच्चा माल मिळणे आवश्यक आहे.

अभिषेक गुप्ता यांनी बांबूच्या उद्योग विकासाबरोबरच संशोधन आणि तंत्रज्ञानाला देखील महत्त्व देणे आवश्यक असल्याचे सांगितले.

बांबूला भौगोलिक निर्देशांक (जीआय टॅग) दिला आणि बौद्धिक संपदा म्हणून घोषित केल्यास स्थानिक पातळीवरील उद्योजक, व्यावसायिक यांना लाभ होईल, असे श्री. गोळे यांनी सांगितले.

ज्युरियन सस्टेनिब्लिटी कंपनीचे संस्थापक कृणाल नेगांधी व जॅक्सन ग्रुपचे चंदन गोसावी यांनी या सत्राचे सूत्रसंचालन केले. या सत्राचे परिषदेचा समारोप झाला.

### जयंत पाटलांवर गलिच्छ शब्दात टीका

# देवेंद्र फडणवीसांनी गोपीचंद पडळकरांचे टोचले कान



**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी सांगली जिल्ह्यातील जत विधानसभा मतदारसंघात बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्यावर गलिच्छ शब्दात टीका केली होती. गोपीचंद पडळकरांच्या या विधानावरुन शरद पवार गट आक्रमक झाला आहे. तसेच शरद पवार यांनी देखील आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करत गोपीचंद पडळकरांनी केलेल्या विधानावरुन नाराजी व्यक्त केली. त्यानंतर आता देवेंद्र फडणवीस यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

गोपीचंद पडळकर यांनी जे विधान केलंय ते योग्य आहे, असं माझंही मत नाही. कोणाच्याही वडिलांबद्दल किंवा परिवाराबद्दल विधान करणं योग्य नाही. या संदर्भात गोपीचंद पडळकर यांच्याशी मी बोललेलो आहे त्यांनाही मी सांगितलंय, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच मला शरद पवारांचा फोन आला होता. मीही त्यांना सांगितलं, अशा प्रकारच्या विधानाचं आम्हीही कधीच समर्थन करणार नाही.

**गोपीचंद पडळकरांना भविष्यात चांगला नेता म्हणून मोठी संधी- देवेंद्र फडणवीस**

गोपीचंद पडळकर हे एक तरुण नेते आहेत. अतिशय आक्रमक नेते आहेत. अनेकवेळा आक्रमकपणा दाखवत असताना आपल्या बोलण्याचा नेमका काय अर्थ निघेल ते लक्षात येत नाही, आणि म्हणून मी गोपीचंद पडळकरांना हे सांगितलेलं आहे की हे लक्षात घेऊनच आपण विधान केलं पाहिजे.

तुम्हाला (गोपीचंद पडळकरांना) भविष्यात चांगला नेता म्हणून मोठी संधी आहे. आपण बोलत असताना काय विचार निघतील, याचा विचार करायला हवा, असा मी सल्ला गोपीचंद पडळकरांना सल्ला दिल्याची माहिती देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांशी बोलताना दिली.

गोपीचंद पडळकर नेमकं काय म्हणाले होते?

गोपीचंद पडळकर यांनी सांगली जिल्ह्यातील जत विधानसभा मतदारसंघात बोलताना, जयंत पाटील यांच्यावर गलिच्छ शब्दात टीका केली होती. जयंत पाटील हा बिनडोक माणूस आहे. दर आठ दिवसाला हा आपण किती बिनडोक आहे हे जयंत पाटील सिद्ध करतोय. गोपीचंद पडळकर जयंत पाटलासारखा भिकाऱ्याची औलाद नाही. कार्यक्रम घेण्याची धमक आपल्यामध्ये आहे. हा जयंत पाटील राजारामबापू पाटील यांची औलाद नसणार आहे. काहीतरी गडबड आहे, अशी पातळी सोडून टीका गोपीचंद पडळकर यांनी केली होती. जयंत पाटलांनी मला एका कंत्राटदाराच्या आत्महत्या प्रकरणात अडकवण्याचा प्रयत्न केला. याने महाराष्ट्र कसा चालवला, जयंत पाटील हा बिनडोक माणूस आहे.

दर आठ दिवसाला हा आपण किती बिनडोक आहे हे जयंत पाटील सिद्ध करतोय. फंडाबाबत आमदार पत्र देऊ शकतो. त्या व्यतिरिक्त आमदाराचा आणि कंत्राटदाराचा काही संबंध येत नाही. जयंत पाटलाचे काम फक्त गोपीचंद पडळकरला बदनाम करण्याचं आहे. पण मी काय आता आलोय का? असे अनेक अंगावर घेऊन आलोय. या प्रस्थापितांच्या सत्ताकारणामध्ये दोन-दोन महिने मी जेलमध्ये जाऊन आलोय. जतमध्ये जयंत पाटलांनी माणसे पाठवली. गोपीचंद पडळकरांनी कोणत्या व्यापाऱ्याकडून पैसे घेतले का याची माहिती घेतली. जर मी कुणाकडून पैसे घेतले असतील तर खंडणीचा गुन्हा दाखल करता येतो का पाहिलं. पण हा गोपीचंद पडळकर जयंत पाटलासारखा भिकाऱ्याची औलाद नाही. कार्यक्रम घेण्याची धमक आपल्यामध्ये आहे. हा जयंत पाटील राजारामबापू पाटील यांची औलाद नसणार आहे. काहीतरी गडबड आहे, असं विधान गोपीचंड पडळकर यांनी केलं होतं.

# मुंबई वगळता सर्व ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढणार

### ठरलं! अजित पवारांची राष्ट्रवादी प्रफुल्ल पटेलांची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**
**नागपूर/ प्रतिनिधी/** विधानसभा निवडणुकीनंतर आता राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेध लागले आहेत. डिसेंबर महिन्याच्या दरम्यान स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकीसाठी जोमाने तयारी करत असून महायुती आणि महाविकास आघाडीतील घटकपक्ष या निवडणुकीत एकत्र लढणार की स्वबळावर लढणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी मोठी घोषणा केली आहे. अजित पवारांची राष्ट्रवादी मुंबई वगळता सर्व ठिकाणी स्वबळावर निवडणूक लढणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

प्रफुल्ल पटेल म्हणाले की, आम्ही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत फक्त मुंबईत महायुती म्हणून एकत्र लढण्यावर विचार करत आहोत. मात्र उर्वरीत राज्यात स्वतंत्र निवडणुकीला आम्ही पुढे जावू. त्यामुळे पक्ष वाढीस मदत होते, स्थानिक स्तरावर स्थानिक नेत्यांना युती करायची असेल तर तो त्यांचा अधिकार असेल.

आम्ही त्यात बोलणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय स्तरावर मेघालय, मणिपूर, बिहारमध्ये निवडणुका लढणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.

**...तर आमचा पक्ष कसा वाढेल?**

मंत्र्यांनी विदर्भात पर्यटन म्हणून येऊ नये. इथे यायचं असेल तर योग्य रितीने आपल्या सहकाऱ्यांना मदत कशी होईल, अशा पद्धतीनं या. नाही तर दोन तासांचे पर्यटक म्हणून यायचं आणि मुंबईत जाऊन दादा आणि तटकरे साहेबांसमोर येतात. मी या जिल्ह्यात जाऊन आलो, हे करुन आलो, याला काही अर्थ नाही, असे म्हणत राष्ट्रवादी अजित पवार गटाचे खासदार प्रफुल्ल पटेल यांनी विदर्भातील पालकमंत्र्यांचे कान टोचले. याबाबत विचारले असता प्रफुल्ल पटेल म्हणाले की, मी जे वक्तव्य केले ते फक्त विदर्भातील पालकमंत्र्यांपुरते नाही तर आमच्या सर्व पालकमंत्र्यांसंदर्भात बोललो.

आमच्या पालकमंत्र्यांनी लोकांचे प्रश्न सोडवले नाही तर मग आमचा पक्ष कसा वाढेल? बाहेरच्या जिल्ह्यातून आलेला पालकमंत्री असला तरी पक्षाचे कार्यकर्ते असतात. त्यांच्या सोबत समन्वयाने काम करायला हवे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री पक्ष बांधणीकडे पाहिजे तसे लक्ष नाही, असे त्यांनी म्हटले.

### 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेसाठी संकेतस्थळावर e-KYC सुविधा सुरु - महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे

**मुंबई/** 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' या योजनेमध्ये पारदर्शकता येण्यासाठी व लाभार्थ्यांना नियमितपणे आर्थिक लाभ मिळावा याकरिता https://ladakibahin.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर श-घधउ ची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. ही प्रक्रिया मोबाईलवरूनही सोप्या पद्धतीने करता येईल. पुढील दोन महिन्यात ही प्रक्रिया लाभार्थ्यांनी पूर्ण करण्याचे आवाहन महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे. या प्रक्रियेमुळे भविष्यातील इतर शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठीही मदत होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य-पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजना राबवली जात आहे. या योजनेच्या माध्यमातून थेट लाभ हस्तांतरण (Direct Benefit Transfer) द्वारे आर्थिक सहाय्य दिले जाते. महिला व बाल विकास विभागाकडून श-घधउ माध्यमातून लाभार्थींचे आधार प्रमाणीकरण केले जाणार आहे. ही प्रक्रिया अतिशय सहज, सोपी व सुलभ असून, महिला स्वत:च्या मोबाईलवरूनही ही प्रक्रिया पूर्ण करू शकतील अशी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यासंदर्भात आर्थिक मागणी करीत असेल त्यास लाभार्थींनी बळी पडू नये असे आवाहनही महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले आहे.

### नवी मुंबई / महापालिकेत समाविष्ट १४ गावांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळेच्या कामांना तातडीने प्राधान्य द्यावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश



**मुंबई/** नवी मुंबई महापालिकेत समाविष्ट १४ गावांमध्ये पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, शाळा ह्या कामांना तातडीने प्राधान्य द्या. या भागातील दप्तर हस्तांतरणाची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवी मुंबई महापालिका आयुक्तांना दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे नवी मुंबई महापालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या १४ गावांच्या विविध मागण्यांबाबत बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ आदी उपस्थित होते.

या गावांमध्ये तातडीने मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवी मुंबई महापालिकेने कार्यवाहीला वेग द्यावा. तात्पुरती आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पोर्टा केबिनच्या सहाय्याने दवाखाने सुरू करण्यात यावे. नावाळी येथे असलेल्या जुन्या इमारतीमध्ये नव्याने रुग्णालय सुरू करण्यासाठी संबंधिताना निर्देश द्यावे, असे उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

वाकळण येथील तलावाचे सुशोभीकरण करून नवी मुंबई महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांमार्फत या गावांमधील साफसफाई करण्यात यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने हटविण्यात यावी तसेच या गावांमधील शासकीय दप्तर नवी मुंबईकडे हस्तांतरीत करण्याच्या प्रक्रियेला वेग देण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिले.

या गावांचा नियोजन आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून रस्ते, पायाभूत सुविधा, जमिनीचा उपयोग आदी घटकांचे सर्वेक्षण ड्रोनच्या माध्यमातून करण्यात येत असल्याचे आयुक्त श्री. शिंदे यांनी सांगितले. नवी मुंबई महापालिकेच्या २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या १४ गावांसाठी १९ कोटी ७० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यामध्ये प्राधान्याने शाळा, आरोग्य केंद्र, पाणी पुरवठा, मलनिस्सारण, पायवाटा, रस्ते या सुविधाचा समावेश असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

### त्याग, तीर्थ आणि खडाजंगी, पुन्हा एकदा सेना विरुद्ध सेना सामना....

एकनाथ शिंदे आज जे कोणी आहेत ते राजन विचारेंनी केलेल्या त्यागामुळे आहेत. त्यामुळे शिंदेंनी विचारेंचे पाय धुवून तिर्थप्राशन करावं असं म्हणत खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला आहे. राऊतांच्या या टीकेला शिंदेंच्या शिवसेनेनंही जोरदार हल्लाबोल केला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा सेना विरुद्ध सेना सामना रंगलाय.

शिंदेंच्या शिवसेनेकडून बाळासाहेबांच्या फोटोशेजारी आनंद दिघेंच्या फोटो छापण्यावरू दोन्ही शिवसेनांमध्ये सुरू झालेल्या सामन्याचा दुसरा अंक आज पाहायला मिळाला. एकनाथ शिंदे आज जे कोणी आहेत ते राजन विचारेंनी केलेल्या त्यागामुळे आहेत असं म्हणत खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर जोरदार हल्लाबोल केला. एकनाथ शिंदेंनी दररोज विचारेंचे पाय धुऊन तीर्थप्राशन करावं असं म्हणत संजय राऊत यांनी शिंदेंवर शरसंधान साधलंय.

तर संजय राऊतांनीच आमच्या ४० लोकांचे पाय धुऊन पाणी प्यावं असं म्हणत शिवसेना नेत्या ज्योती वाघमारे यांनी राऊतांना सडेतोड प्रत्युत्तर दिलं.




तर दुसरीकडे ठाण्यातील आनंदाश्रमाच्या जागेवरुन खासदार संजय राऊतांनी एकनाथ शिंदेंवर टीका केलीये. आनंदाश्रमाची प्रॉपर्टी कुणाच्या नावावर आहे याचा तपास करावा असं राऊत म्हणाले. राऊतांनी शिंदेंवर केलेल्या या टीकेला भाजपचे माध्यम प्रमुख नवनाथ बन यांनी उत्तर दिलंय.

दरम्यान काल संजय राऊत यांनी जाहिरातीत बाळासाहेबांच्या फोटोशेजारी आनंद दिघेंचा फोटो छापल्यावरून शिंदेंवर जोरदार टीका केली होती. त्याविरोधात डोंबिवलीत शिवसेनेने निषेध आंदोलन केलं. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आलं. यावेळी राऊतांवर बोलताना आमदार राजेश मोरेंची जीभ घसरली. तर आंदोलन करणारे गद्दार आहेत. त्यांना आनंद दिघेंचं नाव घेण्याचा अधिकार नसल्याचं म्हणत संजय राऊतांनी हल्लाबोल केला आहे.

बाळासाहेबांच्या फोटो शेजारी आनंद दिघेंचा फोटो छापण्यावरून दोन्ही शिवसेनांमध्ये सुरू झालेली खडाजंगी आता थेट एकमेकांचे पाय धूवून पाणी पिण्यापर्यंत येऊन पोहोचले. त्यामुळे पुढल्या काळात तिर्थ आणि टीकांच्या प्रसादाचं हे पुराण कुठपर्यंत जाणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

## वीजचोरी करणाऱ्या २२ जणांवर गुन्हा दाखल
### स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या १६ जणांचा समावेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर** / मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करणाऱ्या शहर व परिसरातील २२ जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात स्मार्ट मीटरमध्ये फेरफार करणाऱ्या १६ जणांचा समावेश आहे. महावितरणच्या धडक कारवाईमुळे वीजचोरांचे धाबे दणाणले आहे. महावितरणतर्फे अत्याधुनिक असे टीओडी (टाइम ऑफ डे) मीटर सर्वत्र बसवले जात आहेत. टीओडी मीटरमध्ये कम्युनिकेशन पोर्ट असून ते महावितरणच्या सर्व्हरला जोडलेले असल्याने मीटरचा रिअल टाइम डाटा उपलब्ध होतो. मीटर नादुरुस्त झाल्याची तसेच मीटरमध्ये कुणी फेरफार केला तर त्याची थेट माहिती त्याच क्षणी महावितरणला मिळत आहे. अशा ग्राहकांची प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर वीजचोरी पकडली जात आहे.

महावितरणच्या हर्सुल-१ शाखेचे सहायक अभियंता राजेंद्र राठोड हे सहकाऱ्यांसह त्यांच्या कार्यक्षेत्रात तपासणी करत होते. त्यात काही ग्राहक नव्यानेच बसवलेल्या स्मार्ट टीओडी वीज मीटरमध्ये फेरफार करून वीजचोरी करत असल्याचे आढळून आले. अबरार कॉलनी, आरतीनगर, मिसारवाडी येथील शेख निसार शेख हबीब याने ४ हजार ८७ रुपयांची, अब्दुल लतीफ अब्दुल करीम बाघबान याने ८ हजार ९७१ रुपयांची, शेख अब्दुल अजीज शेख रहीम याने ८६६ रुपयांची, शेख हानिफ शेख चांद शेख याने ४ हजार ७४५ रुपयांची, जीशान अब्दुल मुकीम देशमुख याने ३ हजार ६० रुपयांची, शेख अब्बास शेख दादामिया याने २ हजार ३२५ रुपयांची, शेख रशीद शेख अन्वर याने ९४३ रुपयांची, आयानुरबी इस्माईल शहा हिने ६ हजार ७३५ रुपयांची, अय्युब गुलजार खान याने १४३० रुपयांची, शेख कैसर शेख सज्जद याने २ हजार ३०७ रुपयांची, शेख अम्जादूशे शेख सत्तार याने ३ हजार ४५० रुपयांची वीजचोरी केली. यात जीशान अब्दुल मुकीम देशमुख यास १० हजार रुपये तर इतरांना प्रत्येकी २ हजार तडजोड शुल्कही आकारण्यात आले. सहायक अभियंता राजेंद्र राठोड यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींवर सिडको पोलिस ठाण्यात विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

हर्सुल ग्रामीण शाखेचे सहायक अभियंता शेख फेरोज यांनी सहकाऱ्यांसह वीजमीटर तपासणी मोहीम राबवली असता काही ग्राहक स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड करून घरगुती वापरासाठी वीजचोरी करताना आढळले. पिसादेवी येथील जयहिंदनगरमधील सुधाकर विठ्ठलराव विसपुते याने ७ हजार ४७० रुपयांची, प्रवीण दिनकर साळवे याने ८ हजार ७२० रुपयांची, विनोद कैलाशसिंग राजपूत याने ७ हजार ५१० रुपयांची, रमेश कळू कापडणीस याने ६ हजार रुपयांची व कमलाबाई रमेश शिंदे हिने ७ हजार ४९० रुपयांची वीजचोरी केली. सुधाकर विसपुते यास ६ हजार रुपये व इतरांना प्रत्येकी ८ हजार रुपयांचे तडजोड शुल्क आकारण्यात आले. सहायक अभियंता शेख फेरोज यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींवर चिकलठाणा पोलिस ठाण्यात विद्युत कायद्याच्या कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# ‘नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान’ पंधरवड्याला सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी**/ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबरपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून ‘नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान’ महाराष्ट्रभर सुरू झाले आहे. महात्मा गांधी जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) चालणाऱ्या या भव्य उपक्रमांतर्गत १० लाखांहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

पहिल्याच दिवशी १५ हजारांहून अधिक नागरिकांची तपासणी होऊन १,८५७ मोतीबिंदू शस्त्रक्रिया व इतर उपचाराला सुरूवात झाली.




मुख्यमंत्री यांची संकल्पना

संपूर्ण राज्यभर राबविण्यात येणाऱ्या या भव्य उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्नशील आहेत.

**जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरांचे आयोजन**

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ मिळत आहे. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार उपलब्ध करून दिले जात आहेत.

उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग

या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्रतज्ज्ञ रुग्णालये व विविध सामाजिक संस्था सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी ठरत आहे.

**तळागाळातील नागरिकांसाठी दिलासा**

नेत्ररोग उपचाराचा खर्च गोर-गरीब नागरिकांना परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरत आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना उपचाराची संधी या उपक्रमातून उपलब्ध होत आहे.

१७ सप्टेंबर रोजी अभियानातून मिळालेला लाभ

अभियानात सहभागी रुग्णालयांची संख्या : ४२६

आयोजित शिबिरांची संख्या : १२८

शिबिरांत सहभागी एकूण रुग्णसंख्या : १५,४६९

पुढील उपचारासाठी संदर्भित रुग्ण : ७१७

मोफत चष्म्यासाठी नोंदणी झालेल्या रुग्णांची संख्या : १,५९०

मोतीबिंदू शस्त्रक्रिया पार पडलेल्या रुग्णांची संख्या : १,८५७

इतर नेत्र विषयक शस्त्रक्रियांची संख्या (मोतीबिंदू वगळून) : १२७

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सामान्य नागरिकांना डोळ्यापुढे ठेवून सुरू केलेले ‘नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान’ प्रेरणादायी व महत्त्वपूर्ण आहे. या अभियानातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत मोफत नेत्रचिकीत्सा करण्यात येत आहे. विशेषतः झोपडपट्टी व भटक्या समाजातील नागरिकांना या उपक्रमाचा लाभ मिळत आहे. जे रुग्ण आर्थिक परिस्थितीमुळे उपचार घेऊ शकत नव्हते, त्यांनाही मोफत उपचाराची संधी या उपक्रमाद्वारे उपलब्ध झाली आहे. हा उपक्रम तळागाळातील जनतेसाठी मोठा दिलासा ठरत असल्याचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

## बेशिस्तीमुळे अपघातात वाढ

भारतात होणाऱ्या रस्ते अपघाताबाबत काही दिवसांपूर्वी एक अहवाल प्रसिद्ध झाला. भारतातील रस्ते अपघात २०२३ या नावाने प्रसिद्ध झालेला हा अहवाल जितका धक्कादायक आहे तितकाच तो चिंताजनकही आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वात जास्त अपघात भारतात होतात असे नमूद करण्यात आले आहेत. या अहवालानुसार २०२३ या कॅलेंडर वर्षात देशात ४.८० लाख रस्ते अपघात झाले असून त्यात २.८ लाख लोकांना आपला जीव गमवावा लागला. त्यात दोन तृतीयांश लोक १८ ते ३५ या वयोगतील होते. ही गोष्ट अधिक गंभीर आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याची स्वप्ने पाहत आहोत त्यांचे असे अकाली मृत्यू क्लेशदायक आहेत. ऐन उमेदीच्या काळात असे हकनाक मरण यावे लागणे हे केवळ दुःखदायकच नाही तर देशातील रस्त्यांच्या सुरक्षेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. भारतात दिवसाला सरासरी पाचशे अपघात होतात आणि त्यात दरवर्षी लाखो लोक मरण पावतात. भारतात सर्वात जास्त मृत्यू हे रस्ते अपघातात होतात. अमेरिकेनंतर सर्वात जास्त रस्त्यांचे जाळे भारतात आहे. वाहनांची सख्या तर बेसुमार आहे. दरवर्षी त्यात लाखो वाहनांची भर पडते. वाहनांची वाढती संख्या देखील अपघातास कारणीभूत ठरत आहे. भारतातील रस्ते हा तर मोठा विनोदाचा विषय आहे. भारतातील रस्त्याचे जाळे वाढत आहे ही समाधानाची बाब असली तरी आपल्याकडील रस्ते बांधणी सदोष असल्याने अपघात होतात असेही काही जणांचे मत आहे काही वर्षापूर्वी तसा अहवालच आला होता तरीदेखील त्यात सुधारणा होत नाही. रस्ते मग ते महामार्गावरील असोत की ग्रामीण भागातील सर्वच रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य असते. खड्ड्यांमुळे सर्वाधिक अपघात होतात असे मानले जाते. आपल्याकडे रस्त्याच्या तुलनेत वाहनांची संख्याही प्रचंड वाढली आहे. नागरिकांचा सार्वजनिक वाहन व्यवस्थेवर विश्वास नसल्याने जो तो स्वतःच्या खाजगी वाहनांनी प्रवास करतो. वाहनांची सख्या वाढल्याने वाहतूक कोंडी देखील वाढली. महामार्ग असोत की पुण्यामुंबई सारखे मोठे शहरे असोत सर्वत्र रस्त्यांवर वाहनांच्या प्रचंड रांगा लागलेल्या दिसतात. ज्याला त्याला पुढे जायची घाई झालेली असते त्यामुळे वाहतुकीचे नियम न पाळताच गाड्या चालवणाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे त्यातूनही अपघात होतात. वाढत्या वाहतुकीला नियंत्रित करणाऱ्या वाहतूक पोलिसांची संख्या देखील अपुरी आहे. याबाबत शासन दरबारी गंभीर विचार झाला पाहिजे. बहुतांशी अपघात हे मानवी चुकांमुळेच होतात याला कारण आहे वाहन चालकांचा बेशिस्तपणा. वाहन चालक बेजबाबदारपणे वाहन चालवून स्वतः सोबत दुसऱ्यांचा जीवही धोक्यात घालतात. भरधाव वेगात वाहन चालवणे, वाहन चालवताना मोबाईलवर बोलणे, मद्यपान करून वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने वाहन चालवणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, वाहतुकीचे नियम न पाळणे या गोष्टी आपल्याकडे सरास होतात. या गोष्टी वाहन चालकांनी टाळल्या तर अपघातांची संख्या निश्चित घटेल. रस्ते अपघातांची संख्या टाळण्यासाठी शासनानेही ठोस धोरण आखले पाहिजे. रस्त्यांवर बेपर्वाईने वाहन चालवणाऱ्यांना कडक शिक्षा करायला हवी. शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांचे देखील याबाबत प्रबोधन केले पाहिजे.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रसिद्ध हिंदी कवी कुमार अंबुज यांना जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक (प्रतिनिधी)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे दिला जाणारा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार (२०२४) यावर्षी प्रसिद्ध हिंदी कवी कुमार अंबुज यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते येत्या बुधवार दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता नाशिक येथील कुसुमाग्रज स्मारकामधील विशाखा सभागृह येथे होणार आहे.

सन २०१० पासून सुरू झालेला हा पुरस्कार विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनामार्फत दरवर्षी एका निवडक अ-मराठी कवीला दिला जातो. यात रोख एक लाख रुपये, मानचिन्ह आणि मानपत्र दिले जाते. याआधी सुप्रसिद्ध कवी चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मलयाळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सुरजीत



पातर (पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), अमिताभ गुप्ता (बंगाली), नीलिमकुमार (आसामी) अशा अनेक दिग्गजांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने कवी कुमार अंबुज यांच्या नावाची एकमताने शिफारस केली. समितीत नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. राजशेखर शिंदे यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी दिली आहे.

हिंदी कवी कुमार अंबुज यांचा परिचय :-

मध्यप्रदेशातील गुना येथील कवी कुमार अंबुज हे नव्वदनंतरच्या पिढीतील एक दमदार कवी, कथालेखक व समीक्षक म्हणून सुपरिचित आहेत. पण त्यांची ओळख प्राधान्याने कवी म्हणून अधिक आहे. त्यांचे आत्तापर्यंतचे पाच काव्यसंग्रह प्रकाशित झाले असून एक कवितांचे संकलन व संपादन प्रसिद्ध झाले आहे. त्यांना यापूर्वी मध्यप्रदेश साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## शेतीशी निगडीत विविध प्रश्नांवर मयंक गांधी यांचा शेतकऱ्यांशी संवाद

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** परळी तालुक्यात अतिवृष्टी होऊन शेकडो शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. नद्या, नाले, ओढे तुडुंब भरून वाहिल्याने काही पाणी प्रकल्प, बंधारे वाहून गेले आहेत. नुकसान झालेला शेतकरी खचला आहे, नैराश्याच्या गर्तेत जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यांच्यात नवी उमेद जागावी, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा तसेच शेतकऱ्यांचे नेमके प्रश्न व त्यावरील उपाय यावर सार्वजनिक चर्चा झाली पाहिजे. यासाठीच आज शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता बोधेगाव येथे ग्राम विकास मंथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नामांकित उद्योजक तथा समाजसेवक रमण सर, डॉ.हरिश्चंद्र वंगे, सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुरव रूपणर यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

गाव हा विकासाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा, गावाची भंगत अवदशा, येईल देशा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेतील या ओळींप्रमाणे शेतकरी हा देशाचा कणा आहे. गाव सुधारले पाहिजे, शेतकरी सुधारला पाहिजे तरच राष्ट्राची उन्नती होईल. आज आपल्या भागातील शेतकऱ्यांच्या शेकडो समस्या आहेत, त्यावर मात्र कोणीही आवाज उठवत नाही. शेतकऱ्यांचा आवाज बुलंद झाला पाहिजे, त्यांच्या समस्या शासन दरबारी पोचल्या पाहिजेत. यादृष्टीने त्यांचा प्रतिनिधी म्हणून ग्लोबल विकास ट्रस्ट काम करायला तयार आहे. आत्तापर्यंत ३० हजार पेक्षा जास्त शेतकऱ्यांपर्यंत संस्था पोचली असून, विविध प्रकारचे लाभ त्यांना मिळवून दिले आहेत. आधुनिक शेती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. बोधेगाव येथे आज शुक्रवार, दिनांक १९ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता ग्राम विकास मंथन कार्यक्रम होत असून, त्या कार्यक्रमास पंचक्रोशीतील सर्व गावांमधून जास्तीत जास्त संख्येने शेतकरी बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन बोधेगावचे सरपंच माऊली तात्या गडदे, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक तसेच ग्रामस्थांनी केले आहे.

**जलनायक मयंक गांधी शेतकऱ्यांच्या बांधावर!**

अतिवृष्टीने बाधित झालेल्या मलनाथपूर, परचुंडी, भिलेगाव, वाघाळा आदी गावांना गुरुवारी जलनायक मयंक गांधी यांनी भेटी दिल्या. नुकसान झालेल्या शेतांची पाहणी करून, नद्या व नाल्यांच्या अवस्थेचा एकंदर आढावा घेतला. शेकडो एकर शेती पाण्याखाली गेली असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. झालेल्या आपत्तीची भरपाई होणार नाही, मात्र शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी त्यांना आधार देणे गरजेचे आहे. बाधित वरील सर्व गावांतून पापनाशी नदी जाते. ग्लोबल विकास ट्रस्टकडून येणाऱ्या काळात या नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून देण्याचे आश्वासन जलनायक मयंक गांधी यांनी शेतकऱ्यांना दिले. झालेच तर ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले आहे त्यांच्या शेतीचा वास्तविक सर्व्हे करून पुढील उपाययोजना करण्याचा मानस त्यांनी बोलून दाखवला.

# जागतिक स्वच्छता दिन : समाजपरिवर्तनाचा शाश्वत मार्ग

मानव समाजाचा विकास केवळ तांत्रिक प्रगतीवर, औद्योगिक उन्नतीवर किंवा भौतिक सुखसुविधांच्या उपलब्धतेवर होत नाही, तर त्यामागे एक महत्त्वाचा पाया असतो आणि तो म्हणजे स्वच्छता होय. स्वच्छतेशिवाय आरोग्य, आरोग्याशिवाय श्रमशक्ती, श्रमशक्तीशिवाय उत्पादन आणि उत्पादनाशिवाय समाजाची प्रगती अशक्य आहे. म्हणूनच इतिहासापासून आधुनिक काळापर्यंत जगातील सर्व समाजांमध्ये स्वच्छतेला सामाजिक मूल्य, नैतिक कर्तव्य आणि सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग मानले गेले आहे. मात्र विसाव्या शतकानंतर झालेल्या औद्योगिकीकरणाने, वेगवान शहरीकरणाने आणि उपभोक्तावादी संस्कृतीने जगासमोर कचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचे प्रदूषण, वायुप्रदूषण आणि जमिनीची धोकादायक नासाडी असे प्रश्न उभे केले आहेत. याच पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र महासभेने दि. ८ डिसेंबर २०२३ रोजी ठराव क्र. -/ठएड/७८/१२२ मंजूर करून दरवर्षी २० सप्टेंबर हा जागतिक स्वच्छता दिन म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला.

जागतिक स्वच्छता दिन हा दिवस फक्त कचरा गोळा करण्याचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक घटकाला, प्रत्येक नागरिकाला आणि प्रत्येक राष्ट्राला सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देतो. स्वच्छता ही आरोग्याची पायरी आहे, परंतु तिच्या पुढे सामाजिक न्याय, समता, पर्यावरणीय संरक्षण आणि आर्थिक समृद्धीचेही आयाम दडलेले आहेत. त्यामुळेच या दिवसाचे समाजशास्त्रीय महत्त्व अधोरेखित होते.

स्वच्छतेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला, तर दिसते की समाजातील वेगवेगळ्या गटांमध्ये स्वच्छतेच्या संकल्पना भिन्न असतात. ग्रामीण समाजातील लोक स्वच्छतेला पारंपरिक परंपरांशी जोडतात, जसे की दररोज अंगण झाडणे, शौचालयात जाऊन आल्यानंतर हातपाय धुणे, घरातील पवित्रता राखणे. शहरी समाज मात्र आधुनिक साधनसामग्रीच्या मदतीने कचरा व्यवस्थापन करतो, परंतु प्लास्टिकच्या अतिरेकी वापरामुळे शहरातील प्रदूषणाची समस्या अधिक तीव्र झाली आहे. एका गटाची अस्वच्छता दुसऱ्या गटावर आघात करते, उदा. शहरातील नाले गावाकडे वाहून जातात आणि तेथील पिण्याचे पाणी दूषित करतात. यावरून स्वच्छतेचा प्रश्न केवळ वैयक्तिक नसून सामूहिक आहे, हे स्पष्ट होते.

समाजातील असमानता आणि स्वच्छता यांचे नातेही महत्त्वाचे आहे. गरीब वस्त्यांमध्ये राहणारे लोक सुरक्षित, स्वच्छ पाणी व शौचालयाच्या सुविधांपासून वंचित असतात. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर त्यांना मोठा खर्च करावा लागतो, परिणामी दारिद्र्य अधिक वाढते. उलट, सधन वर्ग आरोग्यसुविधा परवडल्यामुळे या संकटापासून वाचतो. म्हणूनच स्वच्छतेचा प्रश्न हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे. जागतिक स्वच्छता दिन या असमानतेकडे जगाचे लक्ष वेधतो आणि सर्वांना समान आरोग्यदायी वातावरण मिळवून देण्याचे आवाहन करतो.

आरोग्य आणि स्वच्छतेचे नाते तर अविभाज्यच आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार दरवर्षी लाखो लोक दूषित पाणी आणि अस्वच्छतेमुळे होणाऱ्या रोगांमुळे मृत्यूमुखी पडतात. भारतातही डेंग्यू, मलेरिया, कॉलरा अशा साथरोगांचा प्रसार अस्वच्छतेमुळे होतो. भारतात ‘स्वच्छ भारत अभियान’ या राष्ट्रीय उपक्रमाने खुले शौचालय निर्मूलन आणि कचरा व्यवस्थापनात लक्षणीय प्रगती साधली असली, तरीही भारतीय लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याचे कार्य अद्याप अपूर्ण आहे. स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेणे ही खरी आवश्यकता आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातून पाहिले, तर कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न जगासमोर भयानक रूपात उभा आहे. प्लास्टिकच्या प्रदूषणाने समुद्री प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. औद्योगिक सांडपाण्यामुळे नद्या आणि तलावांचे पाणी विषारी झाले आहे. जंगलात पडणाऱ्या घनकचर्यामुळे जैवविविधता नष्ट होत आहे. हवामान बदलाचे वेगाने वाढणारे प्रमाणही कचरा व्यवस्थापनातील त्रुटींशी निगडित आहे. अशा परिस्थितीत जागतिक स्वच्छता दिन हा केवळ स्वच्छतेचा नव्हे, तर पर्यावरण वाचविण्याचा दिवस म्हणून पाहिला पाहिजे.

स्वच्छतेचा आर्थिक परिणाम देखील तितकाच महत्त्वाचा आहे. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक व खाजगी खर्च होतो. कामगारशक्ती आजारी पडल्यामुळे उत्पादनक्षमता घटते. पर्यटनाच्या दृष्टीने स्वच्छ शहरं व खेडी हे नेहमीच आकर्षण ठरतात. स्वच्छता राखणारी गावे व जिल्हे हे विकासाच्या दिशेने वेगाने प्रगती करतात. म्हणूनच आर्थिक प्रगतीसाठी स्वच्छतेचे भांडवल म्हणून पाहिले पाहिजे.

संस्कृती आणि स्वच्छता यांचे नाते भारतीय समाजासाठी विशेष आहे. आपल्या धार्मिक परंपरांमध्ये स्वच्छतेला पवित्रतेचे रूप दिले गेले आहे. धार्मिक स्थळे, घरे, अंगणे स्वच्छ ठेवणे हे धार्मिक कर्तव्य मानले गेले. परंतु आज या परंपरांचा लोप होत आहे. उत्सवांमध्ये निर्माल्य, प्लास्टिक सजावट यामुळे नद्या व तळी प्रदूषित होतात. त्यामुळे स्वच्छतेची खरी परंपरा नव्या पिढीला समजावून सांगणे व ती आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेणे अत्यावश्यक आहे.

स्वच्छतेची खरी चळवळ लोकसहभागातूनच यशस्वी होऊ शकते. सरकारने कितीही योजना आखल्या तरी नागरिकांचा सहभाग नसेल, तर त्या योजनांना यश मिळणे कठीण आहे. शाळांमधील विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, महिला बचत गट, स्वयंसेवी संस्था, स्थानिक ग्रामपंचायती या सर्वांचा सहभाग स्वच्छता चळवळीला उर्जा देतो. त्याचबरोबर कचरा गोळा करणाऱ्या कामगारांचे योगदान विसरून चालणार नाही. त्यांच्या श्रमांमुळेच शहरं व गावं स्वच्छ राहतात. त्यांना सामाजिक सन्मान व सुरक्षितता देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

स्वच्छतेचा प्रश्न हा जागतिक विकास उद्दिष्टांशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने ठरवलेले आणि १ जानेवारी २०१६ रोजी लागू केलेले १७ शाश्वत विकास उद्दिष्टे (डऊॠ) स्वच्छतेशिवाय साध्य होऊ शकत नाहीत. ही उद्दिष्टे सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय स्थिरता साधण्यासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारतात. गरिबी निर्मूलन, चांगले आरोग्य, लिंगसमता, शाश्वत शहरे, हवामान कृती, स्वच्छ पाणी व स्वच्छता या सर्व ध्येयांचा पाया स्वच्छतेवरच आहे. त्यामुळे जागतिक स्वच्छता दिन हा प्रत्यक्षात शाश्वत विकासाच्या अजेंड्याला गती देणारा दिवस आहे.

या सर्व विवेचनावरून असे स्पष्ट होते की जागतिक स्वच्छता दिन हा फक्त एका दिवसापुरता प्रतीकात्मक कार्यक्रम नाही, तर तो सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक बदल घडवण्याचे साधन आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस प्रत्येकाला स्वतःच्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतो. आपल्या घरापासून ते शाळा, रस्ते, समाज, गाव, शहर आणि शेवटी राष्ट्र व जग या सर्व स्तरांवर स्वच्छतेची चळवळ रुजली, तरच समाज परिवर्तन शक्य आहे.

आज गरज आहे ती केवळ कचरा उचलण्याची नाही, तर मानसिकतेत बदल घडवण्याची. ‘माझ्या एका कृतीने काय फरक पडणार?’ ही संकुचित मानसिकता मोडून ‘मी बदललो तर समाज बदलेल’ ही जाणीव मनोमन स्वीकारणे ही खरी स्वच्छतेची सुरुवात आहे. जागतिक स्वच्छता दिन हाच संदेश देतो की स्वच्छता ही व्यक्तीगत सवय नसून सामूहिक संस्कृती आहे.

शेवटी, जागतिक स्वच्छता दिन आपल्याला सांगतो की स्वच्छता म्हणजे आरोग्य, पर्यावरण, अर्थकारण, सामाजिक समता आणि सांस्कृतिक मूल्ये यांचा संगम आहे. २० सप्टेंबरचा हा दिवस आपण सर्वांनी सामूहिक जबाबदारीचा दिवस म्हणून पाळला, तर तो समाजपरिवर्तनाचा पाया ठरेल. प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेला जीवनशैलीत सामावून घेतले, तरच हा दिवस खऱ्या अर्थाने यशस्वी ठरेल.

**-डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# संभाजीनगर चे पालक मंत्री संजय शिरसाठ यांनी पिंपळवाडी (पी.)गावाकडे फिरवली पाठ

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी प्रतिनिधि / हारून/ शेख/** पैठण तालुक्यातील पिंपळवाडी( पिराची) १८ सप्टें २०२५ रोजी चे दौर्या मध्ये पैठण तालुक्यातील १० गावाची पाहणी करणार होते.




अतिवृष्टि मध्ये नुकसान झालेल्या परिवारची भेंट घेण्यासाठी पालकमंत्री संजय शिरसाठ, आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख विलास बापु भुमरे यांनी प्रत्येक गावात जाऊन पाहणी केली, असता पिंपळवाडी (पी.)हे गाव दौरे नियोजनात असताना सुध्दा पालक मंत्री,आमदार यांनी गावात ६०/७० घरामध्ये पाणी शिरले असताना गावाची पाहणी केली नाही. यामुळे गावतील नागरीक नाराजगी व्यक्त करत आहेत.अधिक माहीती अशी की १४ सप्टें ते १६ सप्टें २०२५ ला पिंपळवाडी परीसरा मध्ये मुसळधार पावसामुळे नागरिकांचे घरात पणी शिरल्या ने बेहाल परीस्थिति निर्माण झाली होती.

संसारोपयोगी साहीत्य अन्नधान्य वाहुन गेले अणि लाखोंचे नुकसान होऊन सुध्दा आतापर्यंत कुठलेही महसुल चे कर्मचारी किंवा तहसीलदार, व कुठलेही राजकीय पुढारी तर नाहीच गावचे तलाठी सुद्धा गावात पाहणी करण्यासाठी आलेले नाहीत. अधिक माहीती अशी की पिंपळवाडी पिराची हे धरणग्रस्त गाव आहे येथे राहणारा वर्ग हा रोजा मजुरी करणार गरीब वर्ग आहे.विषेष बाब अशी की येथे मोठे प्रमाणात आदिवासी समाज आहे. भील्ल आदिवासी समाजाच्या झोपडया आणि शेड मध्ये पाणी शिरुन बरचेस नुकसान झाले आहे.

तरी प्रशासनाचे कुठले ही पंचनामे नाही. काहीच हालचाल करताना दिसत नाही . या गावाला कोणी वाली नाही का? अशी ग्रामस्थामध्ये चर्चा होत आहे.

आपल्या गावाची आठवण राजकीय पुढारींना निवडणुकी च्या वेळेस येते अणि आपतकालीन वेळे मध्ये गावाकडे पाठ फीरवताना दिसत आहेत असा नागरीकांचा समज होत आहे.

# खुलताबाद येथील बाईस ख्वाजा रह. यांच्या उरुसानिमित्त ऑल इंडिया मुशायरा रंगला

**आत्ताच णक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद येथील हजरत ख्वाजा सय्यद जैनोद्दीन मौलाना दाऊद हुसैन शिराजी उर्फ बाईस ख्वाजा रह. यांच्या ६७६ व्या वार्षिक उरूसानिमित्त गुरुवारी ( दि१८) दर्गा परिसरात भव्य ऑल इंडिया मुशायरा पार पडला.या मुशायराला देशभरातील नामवंत शायर व कवींनी हजेरी लावून काव्याचा अविस्मरणीय जल्लोष घडवून आणला.



दर्गा कमिटीच्या वतीने रात्री ९ वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात शायर अबरार कश्फी, हामेद भुसावली, सुंदर मालेगावी,शकील कुरेशी,साबेर मुस्तफाबादी,हाशिम फिरोजाबादी इम्रान फारसी, युसूफ राणा, खान मुखिम खान यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपल्या नातिया रचना सादर केल्या. शायरांच्या ओजस्वी सादरीकरणाने वातावरण भारावून गेले. श्रोत्यांनी उत्स्फूर्त टाळ्यांनी कवींना दाद देत त्यांचे मनोबल उंचावले.या मुशायरामुळे उरूस उत्सवाला धार्मिकतेसोबतच सांस्कृतिकतेचा देखील नवा आयाम लाभल्याचे मान्यवरांनी सांगितले. या प्रसंगी दरगाह कमिटी हद्दे खुर्द चे अध्यक्ष शरफोद्दीन रमजानी, उपाध्यक्ष अलीमोद्दीन मुजावर, सचिव मसीयोद्दीन यांच्यासह सर्व पदाधिकारी व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दर्गा कमिटीकडून शायरांचा सत्कार**

मुशायराच्या यशस्वी आयोजनानंतर सहभागी नामवंत शायरांचा दर्गा कमिटीकडून दर्गा कार्यालयात दस्तारबंदी करून सत्कार करण्यात आला. या वेळी शायर अबरार काशिफ, हाशिम फेरोजाबादी यांना विशेष सन्मान देण्यात आला.सत्कार सोहळ्यास अध्यक्ष शरफोद्दीन मो. रमजानी, सचिव मसीयोद्दीन,शेख हुस्नोद्दीन, इरफ़ानोद्दीन, नजिमोद्दीन,माजी नगराध्यक्ष अँड. कैसरोद्दीन, अँड. शब्बीर अहेमद,तौसीफ अहेमद,शेख वाजिद, मुनीबोद्दीन, इमरान जागीरदार,शेख शाहजेब. अजहर अहमद.यांचे सह आदी मान्यवर उपस्थित होते.

# आप्पासाहेब पाटील पानकर यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुका कार्याध्यक्षपदी निवड

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी सुभान शहा** / पंचायत समितीचे माझी उपसभापती श्री आप्पासाहेब पाटील पानकर, यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुका कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली निवडीचे पत्र जिल्हा अध्यक्ष श्री पांडुरंग पाटील तांगडे यांनी राष्ट्रवादी भवन सिडको येथे एका कार्यक्रमाप्रसंगी दिले असून. या प्रसंगी गंगापूर तालुका अध्यक्ष सूर्यकांत पाटील थोरात तालुका सरचिटणीस.




श्री काशिनाथ पाटील धरपळे शहर उपाध्यक्ष, श्री संतोष काटकर, श्री सलीम शेख, श्री आशिष पवार, व इतर मान्यवर उपस्थित होते. या निवडीबद्दल संभाजीनगर जिल्हा संपर्कप्रमुख माझी आमदार श्री चंद्रकांत दानवे, माजी आमदार किशोर पाटील, माजी आमदार संजय वाकचौरे, जिल्हा कार्याध्यक्ष विश्वजीत चव्हाण, विधानसभा अध्यक्ष कडूबा हिवाळे, गंगापूर शहराध्यक्ष श्री अहमद पटेल, यांनी श्री पानकर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या विकासाचा पाया... आ.रमेश बोरणारे




**आत्ताच एक्सप्रेस**
**वैजापूर प्रतिनिधी/** वैजापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा शहरानजीक असलेल्या कांदा मार्केटमध्ये शुक्रवारी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

वैजापूर तालुक्याचे आमदार रमेश बोरणारे या सभेला संबोधित करताना म्हणाले की बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या विकासाचा पाया असून कुठल्याही एका पक्षाची नाही. त्यामुळे या ठिकाणी राजकारण न आणता बाजार समितीला कुटुंब मानून निवडून आलेल्या १८ ही संचालकांनी काम करावे.

कृषी उत्पन्न बाजार समितीसाठी घेतलेल्या १० एकर जागेची डेव्हलपमेंट करा अशा सूचनाही त्यांनी यावेळी सभापतींसह संचालकांना केल्या. काही दिवसांपूर्वी एका व्यापाऱ्याने जवळपास ४०० शेतकऱ्यांची दोन कोटी रुपयांची फसवणूक केली. मात्र बाजार समितीने शेतकऱ्यांना सेजमधून जमा होणाऱ्या पैशातून ५० टक्के रक्कम देणारी महाराष्ट्रात वैजापूर बाजार समिती पहिली ठरल्याचेही ते म्हणाले .

या बैठकीला सभापती रामहरी जाधव, साबेर खान, माजी उपनगराध्यक्ष अकील शेख, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, तालुकाप्रमुख राजेंद्र साळुंके, संजय बोरनारे , कल्याण दांगोडे, संचालक रियाज शेख, प्रशांत त्रिभुवन, सचिव प्रल्हाद मोठे आदींसह संचालक मंडळ, कर्मचारी ,व्यापारी व शेतकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जांबरगाव उप बाजार समितीला आमदार बोरनारेंचे नाव...

जांबरगाव येथील उपबाजार समितीला कार्यसम्राट आमदार रमेश पा. बोरणारे यांचे नाव देण्यात यावे असा प्रस्ताव शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजेंद्र साळुंके यांनी या वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडला.या प्रस्तावाला वसंत त्रिभुवन यांनी अनुमोदन दिले. प्रस्तावास मंजुरी देण्यासाठी सभासदांनी हात उंचावून होकार दर्शविला.

पुन्हा एक षटकार ठोकणार....

वैजापूर तालुक्यातील प्रलंबित असलेल्या औद्योगिक वसाहतीसाठी लवकरच मान्यता मिळणार असल्याचे आमदार बोरनारे म्हणाले. रामकृष्ण गोदावरी उपसा जल सिंचन योजनेतील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करून पहिला षटकार ठोकला व आता औद्योगिक वसाहतीचा प्रश्न मार्गी लावून मी दुसऱ्या षटकार ठोकणार असून या संदर्भातील बैठकीसाठी मी आज मुंबईला जात असल्याचे ते म्हणाले.

# गंगापूरमध्ये सार्वजनिक नवरात्र उत्सवाचा भव्य शुभारंभ – कीर्तन व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर /प्रतिनिधी सुभान शहा /** गंगापूर शहरातील सार्वजनिक नवरात्र उत्सव समितीच्या वतीने यंदाही उत्सवाचा भव्य कार्यक्रम जिल्हा परिषद मैदान, गंगापूर येथे आयोजित करण्यात आला आहे. सलग ९ व्या वर्षी होणाऱ्या या उत्सवाचे नेतृत्व मा. नगराध्यक्ष संजय जाधव व आयोजन समितीच्या अध्यक्षा सौ. सुवर्णा संजय जाधव करत आहेत.उत्सवाची सुरुवात दि. २२ सप्टेंबर २०२५ रोजी, घटस्थापनेच्या दिवशी सायंकाळी ७ वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या रसाळ कीर्तनाने होणार आहे. दि. २३ सप्टेंबर ते २९ सप्टेंबर दरम्यान ह.भ.प. भागवताचार्य बाळू महाराज गिरगावकर यांच्या सुश्राव्य वाणीतून देवी भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. दररोज कथा झाल्यानंतर फराळ प्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली.

या कार्यक्रमात विशेष आकर्षण ठरणार आहे दि. ३० सप्टेंबर रोजी होणारा होम मिनिस्टर – खेळ खेळूया पैठणीचा कार्यक्रम. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध निवेदक रमेश परळीकर करणार असून, महिलांसाठी असंख्य आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.प्रथम पारितोषिक – इलेक्ट्रिक स्कूटर, त्यानंतर वॉशिंग मशीन, फ्रीज, मिक्सर तसेच ३० आकर्षक पैठण्या आणि सहभागी महिलांना आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहेत.

दि. ०१ ऑक्टोबर रोजी ५० हून अधिक कलाकारांच्या सहभागासह डिजिटल धुमाकूळ हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार आहे. उत्सवाची सांगता दसऱ्याच्या दिवशी, भव्य शोभायात्रा/मिरवणुकीने होणार आहे. या मिरवणुकीत पारंपरिक वाद्यवृंद, देवीची सजवलेली मूर्ती आणि विविध सांस्कृतिक झांजांचा सहभाग असेल.या निमित्ताने आयोजिका सौ. सुवर्णा संजय जाधव यांनी गंगापूर तसेच पंचक्रोशीतील नागरिकांना आवाहन केले आहे की, या भव्य धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचा सर्वांनी लाभ घ्यावा व उत्सवाची शोभा वाढवावी.

# जवखेडा येथे प्रशिक्षक शिक्षका जयश्री मोटे यांचा सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम/** कन्नड तालुक्यातील जवखेडा बु. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्हा परिषद शाळेच्या प्रशिक्षक शिक्षिका जयश्री मोटे-आघाडे यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.




त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, प्रतिमा व भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या प्रसंगी मुख्याध्यापक पंढरीनाथ जाधव, सरपंच प्रविण हराळ,उपसरपंच कचरू नरवडे, भाऊसाहेब काचोळे, लक्ष्मण हराळ, भगवान निकम, मोमीन शहा,मनोज शिखरे, विजय हराळ, मनोज शिखरे, गणेश सोनगिरे, सुषमा आयलाने ,बेबीबाई मातेरे,मिराबाई हराळ,पो. पा. उषाबाई सोनगिरे, आशा सेविका रेखा गाडेकर,नर्मदा मातेरे,सोनगिरेसह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक करपे यांनी केले.

# विष्णू मालोदे गुरुजींना आदर्श पुरस्काराने गौरविण्यात आले

**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील पदवीधर शिक्षक विष्णू मालोदे गुरुजींना उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

जि.प उच्च प्राथमिक शाळा सोबलगांव येथील शाळेचे पदविधर शिक्षकांनी शाळेत , गावात सामाजिक कार्यात उत्कृष्ट केल्यामुळे आदर्श शिक्षक समिती प्रणीत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले पतसंस्था व आदर्श शिक्षक कर्मचारी पतसंस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत आदर्श पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले .

त्याबद्दल सोबलगांवातील समाज सेवक प्रकाश आघाडे , मुख्याध्यापक बाबुलाल राठोड, शालेय अध्यक्ष आजिनाथ पवार ,माजी उपसरपंच आदिनाथ साळुंके , संतोष साळुंके , अरुण साळुंके , सुखदेव सुरासे, सहशिक्षिका स्वाती लाड, केंद्र प्रमुख रविंद्र सोनवणे ,अलका शिंदे , वर्षा बोडखे . प्रशांत भातखेडकर , अशोक महालकर ,तेजस क्षीरसागर , संजीव पानसरे सह पदाधिकारी कार्यकर्ते नातेवाईक चाहते मित्रमंडळ नागरिकांनी कौतुक व अभिनंदन केले.



## संक्षिप्त

# क्षय रुग्णांना पोषण आहार किटचे वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ भारत सरकारच्या वतीने दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यातील उपचाराधिन ९० क्षयरोग रुग्णांना गजलक्ष्मी स्टीलकडून कोरडा पोषण आहार किटचे वाटप आज दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. गजानन पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती भुसारे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. गोपाल कुडलीकर, डॉ. रमेश काकड, डॉ. परशुराम नारदरवाड व गजलक्ष्मी स्टीलचे संचालक अनुप जाजू यांची उपस्थिती होती.

# महाराष्ट्र बालकामगार- २०२५ नियम प्राथमिक अधिसूचनेबाबत मागविल्या हरकती

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/महाराष्ट्र बालकामगार (प्रतिबंध व विनियम) नियम,२०२५ नियमांची प्राथमिक अधिसूचना महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्रात दि.७ ऑगस्ट २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. या अधिसूचनेच्या अनुषंगाने हरकती व सूचना असल्यास कामगार आयुक्त यांचे कार्यालय, कामगार भवन, सी-२०, ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे पुर्व मुंबई -४०००५१ या पत्यावर लेखी स्वरुपात पाठविण्यात याव्यात. ही अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. असे सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ वर्ष २०२५-२६ साठी राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेतंर्गत व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारीत वेळापत्रक शासनास्तरावरुन प्राप्त झाले आहे. पंडित दिनदयाळ उपाध्याय व स्वयंम व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी व्यवसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी अर्ज करावयाचा कालावधी दि.१९ ते २९ सप्टेंबर २०२५ असा करण्यात आला आहे. तरी जालना जिल्ह्यातील व्यावसायिक अभ्यासक्रम करीत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी दि. १९ ते २९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर भेट देऊन परिपूर्ण अर्ज सादर करावेत. व त्याची एक प्रत इतर मागास बहुजन कल्याण, जालना या कार्यालयात सादर करावी, असे आवाहन सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# परतूर तहसील कार्यालयाकडून सेवा पंधरवड्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ परतूर तालुक्यात सेवा पंधरवाडा २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या सेवा पंधरवड्यात विविध शासकीय योजनेचे लाभ तहसील कार्यालयाकडून देण्यात येणार आहे. तरी संबंधित मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्राम पंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधून आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन परतूरच्या तहसीलदार डॉ.प्रतिभा गोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. सेवा पंधरवड्यात संजय गांधी योजना विभागांतर्गत निराधार व्यक्ती, अनाथ मुले-मुली, दिव्यांग व्यक्ती, आत्महत्या केलेले शेतकऱ्यांचे कुटुंबिय, दुर्धर आजारग्रस्त, विधवा, परित्यक्ता महिला, देवदासी, वेश्या व्यवसायातून मुक्त महिला, तृतीयपंथी व इतर गरीब-वंचित घटकांचा शोध घेवून त्यांना लाभ उपलब्ध करुन देणे हा मुख्य उद्देश आहे. सेवा पंधरवाड्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संबंधित मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि ग्राम पंचायत अधिकारी यांची आदेशाद्वारे नियुक्ती केली आहे. असेही कळविले आहे.

# नवरात्र उत्सवाहनिमित्त वाहतुकीच्या मार्गात बदल

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ नवरात्र उत्सवासानिमित्त अंबड येथील मत्स्योदरी देवी संस्थानच्या यात्रे दरम्यान अपघात घडू नये यासाठी दि.२२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आला आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत. यात्रेच्या अनुषंगाने दि.२६ ते २८ सप्टेंबर व दि.६ ऑक्टोबर २०२५ रोजी बीड-शहागड-अंबड-जालना मार्गे जाणारी वाहतुक बीड-गेवराई-शहागडकडून अंबडकडे येणारी जड वाहतुक शहागड-वडीगोद्री-पाचोड मार्गे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा अंबड मार्गे -जालनाकडे जारी वाहने या पर्यायी मार्गाने जातील व येतील. घनसावंगी-अंबड-जालना मार्गे जाणारी वाहतुक घनसावंगी व तिर्थपुरीकडून -अंबडकडे येणारी जड वाहने सुतगिरणी चौफुली घनसावंगी मार्गे राणी उंचेगाव-जालनाकडे जातील व येतील. आदेश दि.२६ सप्टेंबर रोजी रात्री १२ पासून ते दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत व कोजागिरी पौर्णिमा दिवशी दि.६ ऑक्टोबर रोजी रात्रीपर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

# वाघ्रूळ (ज.) महसूल मंडळाचा अतिवृष्टीमध्ये समाविष्ट करण्याची निवेदनाद्वारे मागणी

## भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे शेतकऱ्यांसह थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ जालना तालुक्यातील वाघ्रूळ (ज.) महसूल मंडळामध्ये दि. १५ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे व ढगफुटीमुळे परिसरातील मौजे वाघ्रूळ, कुंबेफळ, वरखेडा, पोखरी (सिं.), इंदलकरवाडी, गोंदेगाव, वंजारउम्रद, माळेगाव, माळशेंद्रा, धावेडी, कडवंची, अंभोरेवाडी, नंदापूर, नाव्हा, वरुड, धारकल्याण, थार या गावांतील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. परंतु ड्ज्ञूशीं थशरींहशी डींरींळेप बंद असल्यामुळे वाघ्रूळ (ज.) महसूल मंडळाचा समावेश अतिवृष्टीग्रस्त भागामध्ये करण्यात आलेला नाही.

सदर बाब भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या लक्षात येताच त्यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि. १७ सप्टेंबर रोजी ड्ज्ञूशीं थशरींहशी डींरींळेप चे क्षेत्रीय अधिकारी, कृषी मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक तसेच पंचायत समिती सदस्य व गावकऱ्यांच्या उपस्थितीत पंचनामा करून अहवाल विभागाकडे सादर करण्यात आला आहे. तरीसुद्धा या महसूल मंडळाचा समावेश अद्याप झाला नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. वाघ्रूळ (ज.) महसूल मंडळा लगतच्या जालना ग्रामीण व रामनगर ग्रामीण मंडळातील ड्ज्ञूशीं थशरींहशी डींरींळेप ची आकडेवारी ग्राह्य धरून वाघ्रूळ (ज.) महसूल मंडळाचा समावेश अतिवृष्टीग्रस्त भागात करून शेतकऱ्यांचे पंचनामे तातडीने करण्यासाठी आदेश द्यावेत अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी शेतकऱ्यांसोबत थेट जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन हा प्रश्न हाताळला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेतात, हे पुन्हा एकदा दिसून आले. अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी त्यांनी तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

यावेळी बद्रीनाथ पठाडे, जिवन सले, धनराज काबलिये, सुनील खरे, गजानन खरात, सिद्धिविनायक मुळे, अनिल सरकटे, कपिल दहेकर, सतीश केळकर, बद्रीनाथ वाघ, कैलास उबाळे, करण निकाळजे, पांडुरंग क्षीरसागर, प्रताप घोडके, रोहित नलावडे, राजू वाघ, कैलास सोळुंके, नागेश अंभोरे, कृष्णा खिल्लारे आदींसह उपस्थिती होती.

# जिल्हाभरात नमो नेत्र संजीवनी अभियानास सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्याभरात नमो नेत्र संजीवनी अभियान दि १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या दरम्यान राबविण्यात येत आहे. हे अभियान राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून व मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे. अशी माहिती मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाचे प्रमुख डॉ. सोपान चव्हाण यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. महात्मा गांधी जयंतीपर्यंत चालणाऱ्या या भव्य अभियानांतर्गत १० लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया, औषधोपचार व चष्मा वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. जिल्ह्यात ठिकठिकाणी नेत्र तपासणी शिबीर घेण्यात येत आहे व डोळ्याच्या शस्त्रक्रियेचे शिबीर सुद्धा घेण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये तालुका व गावापातळीवर नेत्र तपासणी शिबीर आयोजित केली जात आहे. गाव, तांडे यासह दुर्गम भागातील नागरिकांना याचा लाभ मिळत आहे. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न रुग्णालये यांच्या मार्फत मोफत शस्त्रक्रिया, औषध- उपचार व चष्मा वाटप सेवा दिली जात आहे. या अभियानात सार्वजनिक आरोग्य विभाग, इंडियन मेडिकल असोसिएशन, महानगरपालिका, धर्मादाय रुग्णालय, महात्मा फुले जन आरोग्य योजना रुग्णालय, खाजगी नेत्र तज्ज्ञ, एनजीओ अंतर्गत असलेले रुग्णालय, विविध सामाजिक संस्था व इतर संघटना यांनी सदर अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून जास्तीत जास्त गरजू लाभार्थी पर्यन्त सेवा कशी पोहोचवता येईल. याकडे लक्ष देऊन काम करत आहे. या अभियान मार्फत घेण्यात येणाऱ्या शिबिरामुळे गोरगरीब नागरिकांना खूप दिलासा देणारी बाब ठरत आहे. असेही कळविले आहे.

# जिल्हास्तरीय आंतरशालेय तायक्कांदो स्पर्धेचा समारोप

## तायक्कांदोने जिल्ह्याच्या खेळ संस्कृतीला नवी दिशा दिली-विष्णू पाचफुले




**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जालना व तायक्कांदो असोसिएशन जालना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि. १९ सप्टेंबर रोजी क्रीडा संकुलात पार पडलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय तायक्कांदो स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्ह्यातील ६५ हून अधिक खेळाडूंनी या स्पर्धेत दमदार सहभाग नोंदविला.

या स्पर्धेचे उद्घाटन शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी तायक्कांदो असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे, मराठा महासंघाचे कोषाध्यक्ष अशोक पडुळ, जिल्हा पोलीस दलातील कर्मचारी व तायक्कांदो असोसिएशनचे महासचिव सचिन आर्य, क्रीडा प्रशिक्षक आश्विन जोगदंड, सिद्धार्थ कदम, फईम खान यांची उपस्थिती होती.

उद्घाटनप्रसंगी बोलताना विष्णू पाचफुले म्हणाले की, दहा वर्षांपूर्वी जिल्ह्यात तायक्कांदो हा खेळ लोकांना फारसा माहीत नव्हता. मात्र, आज या खेळाला जगभर लोकप्रियता मिळाली असून, जिल्ह्यातही स्पर्धा आयोजित होत आहेत, ही अभिमानाची बाब आहे. अशा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छाशक्ती व हिम्मत लागते. ती कुणी देत नाही; ती प्रत्येक खेळाडू स्वतः घडवतो. अशा छोट्या पातळीवरून पुढे जाताना खेळाडू मोठ्या पातळीवर आपला ठसा उमटवू शकतात व जिल्ह्याचा नावलौकिक वाढवू शकतात.

प्रास्ताविकपर भाषणात अरविंद देशमुख म्हणाले की, तायक्कांदो हा फक्त क्रीडा प्रकार नसून शिस्त, आत्मविश्वास व शारीरिक तंदुरुस्ती घडविण्याचा उत्तम मार्ग आहे. जालन्यातील तरुणांनी या खेळातून घडविलेली कामगिरी प्रेरणादायी आहे. पुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जालन्यातील खेळाडू आपला ठसा उमटवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सय्यद निसार, राहुल ढाकणे, राहुल गायके, स्पर्धेचे पंच म्हणून जबाबदारी पार पाडणारे मयूर पिवळ, सचिन गादेवाड, ज्ञानेश्वर मोरे, भागवत गोरे, आदित्य चव्हाण, हरीश खराबे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### विश्वकर्मा पूजन दिन व राज्य मेळावा उत्साहात संपन्न...

# वेरूळ हे विश्वकर्मा वंशीयांचे शक्तिपीठ – प्रा. नागोजीराव पांचाळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**विशेष प्रतिनिधी /शिवाभाऊ दौंड**/ क्षेत्र वेरूळ हे विश्वकर्मा वंशीय समाज बांधवांचे शक्तिपीठ आहे म्हणूनच दर्शवर्षी १७ सप्टेंबर रोजी महाराष्ट्रातील तमाम सुतार, लोहार, सोनार, तांबट, शिल्पकार, जांगिड व पांचाळ समाज बांधव इथे मोठ्या संख्येने एकत्र येतात प्रभू भगवान श्री विश्वकर्मांच्या चरणी लीन होतात. आणि मोठी ऊर्जा घेऊन जातात, असे प्रतिपादन विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नागोजीराव पांचाळ यांनी केले.

गुरुवर्य महंत महेंद्र बापूजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यास गंगापूरचे आ. प्रशांत बंब, छत्रपती संभाजीनगर येथील विधानपरिषदेचे आ. संजय केणेकर, मनमाडचे मा. आ. राजेंद्र देशमुख, नियोजन समितीचे अध्यक्ष राजेश नागपुरे,कार्याध्यक्ष अरुण भालेकर, उपाध्यक्ष गोपाल राऊत,सचिन सुतार, प्रसिद्धी प्रमुख भगवान राऊत, सचिव विलास पवार, कोषाध्यक्ष गणेश गव्हाणे, उपाध्यक्ष धनराज वेलणकर, संजय शहाणे, शिवानंद थोरकर, रोहिदास जांगिड, उद्योजक तानाजी शेटे, महिला कार्याध्यक्ष शुभदा धामापूरकर, कोकण विभागीय अध्यक्ष रामचंद्र मिस्त्री, पराग अहिरे, सुनीता भालेराव आदी मान्यवर विचारपीठावर उपस्थित होते.

न्यायमूर्ती रोहिणी आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी झाली पाहिजे कारण न्या. रोहिणी आयोज म्हणजे मायक्रो ओबीसींच्या संरक्षणाची ढाल आहे. नवीन पिढीने इथून पुढे उच्च शिक्षणातील नवीन वाटा व नवनवीन क्षेत्र निवडले पाहिजे. त्याच बरोबर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद, महानगर पालिका या स्थानिक संस्थांच्या निवडणुका समाज बांधवांनी लढविल्या पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी आ. प्रशांत बंब, आ. संजय केणेकर, गुरुवर्य महंत महेंद्र बापू, अरुण भालेकर, पराग अहिरे यांचीही भाषणे झाली. राजेश नागपुरे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना, संघटनेची ध्येय धोरणे व दिशा याबाबत सविस्तर विवेचन केले. सुदाम नलावडे यांनी युवकांना उद्योगाविषयी






मार्गदर्शन केले तर विजय सुरासे यांनी स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन केले.

लवकरात लवकर रोहिणी आयोग शिफारशी लागू कराव्यात. व या विश्वकर्मा समाजास अती मागास प्रवर्गात टाकावेत.सुतार लोहार सोनार समाजासाठी आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली पण अजूनही एकाही महाराष्ट्रातल्या कारागिरास

आर्थिक लाभ मिळाला नाही त्या करिता शासनाने गंभीर पाऊल उचलावे.शासनाने झच् विश्वकर्मा योजना चालू केली यातून निश्चित किती विश्वकर्मा सुतार लोहार सोनार तांबट पाथरवट यांना लाभ मिळाला आहे याची श्वेतपत्रिका काढावी. विश्वकर्मा वंशीय समाज हा शिल्पकार समाज आहे त्या करिता शिल्पकला विद्यापीठ स्थापन करून त्याला भगवान विश्वकर्मा शिल्पकला विद्यापीठ नाव द्यावे.१७ सप्टेंबर रोजी विश्वकर्मा जयंती भारत भरात साजरी केली जाते त्या दिवशी सार्वजनिक शासकीय सुट्टी जाहीर करावी.

शासकीय योजनेत विश्वकर्मा वंशीय समाज संघटन पदाधिकारी यांना शासन मान्य सदस्य म्हणून राज्य जिल्हा पातळीवर घ्यावेत जेणे करून समाज बांधव भगिनी यांना लाभ देण्यास मदत होईल. प्रभू विश्वकर्मा मंदिरात गुरुवर्य महंत महेंद्र बापू यांच्या प्रमुख उपस्थितीत पूजा, अभिषेक, व होम, हवन झाले. त्यानंतर लोकमाता अहिल्यादेवी होळकर जल कुंडापासून प्रभू विश्वकर्मांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विजय पांचाळ व भगवान राऊत यांनी सूत्रसंचालन केले. सचिन सुतार व अरुण भालेकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष अमोल डोळस, चंदू हिवाळे, परमेश्वर पांचाळ, राजकुमार राऊत, प्रसाद गडकर, बालाजी पांचाळ, अरुण वाघमारे, गोपाल राऊत, व्यंकट पांचाळ यांनी परिश्रम घेतले.धनराज वेलणकर राज्य उपाध्यक्ष,रामचंद्र मिस्त्री, विकास सुतार ,दिलीप पांचाळ,गणेश गव्हाणे,केशव सपकाळ,सचिन सुतार ,संजय सुतार,विलास पवार,व्यंकट पांचाळ,गणेश आढाव,बालाजी सांगुळे,अशोक गायकवाड,सत्यनारायण पांचाळ,सर्जेराव कळसकर,विशाल जवरकर, बालाजी पांचाळ,कल्याण घुसळकर यांनी मेहनत घेत कार्यक्रम यशस्वी केला.

# पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त मोती-गव्हाण येथे भव्य सर्व रोगनिदान शिबीर व रक्तदान शिबीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ भारताचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक २१ सप्टेंबर रोजी मौजे मोतीगव्हाण ता.जि.जालना येथे सर्व रोगनिदान शिबीर व रक्तदान शिबिर तसेच विविध विकास कामांचे लोकार्पण सकाळी ९.०० ते सायं ५.०० पर्यंत आयोजित करण्यात आले असून याचे उदघाटन भारत देशाचे माजी मंत्री जालना जिल्हा लोकनेते श्री.रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते होणार आहे.

यावेळी माजी आ.कैलासजी गोरंटयाल भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी महानगर जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, विजय कामड, विमलताई आगलावे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष सौ. शुभांगीताई देशपांडे, भाजपा युवानेते अक्षय गोरंटयाल, महानगर ग्रामीण मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, नवीन जालना मंडळ अध्यक्ष सुनील खरे, जुना जालना मंडळ अध्यक्ष महेश निकम, पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे, महिला मोर्चा ग्रामीण मंडळ अध्यक्षा सौ.सुषमा खरात यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या शिबिरा सोबतच यावेळी गावांमध्ये स्वच्छता अभियान, एक पेड मा के नाम अंतर्गत वृक्षारोपण, विविध पूर्ण झालेली विकास कामांचे लोकार्पण तसेच विविध तज्ज्ञ डॉक्टर, स्त्री रोग तज्ञ, बालरोग तज्ञ, एमडी मेडिसिन, त्वचारोग तज्ञ, हाडांचे तज्ञ व नेत्र तज्ञ डॉक्टर सह अनेक तज्ञ डॉक्टरांची यावेळी उपस्थिती राहणार असून यावेळी नागरिकांची त्यांच्याकडून तपासणी होणार आहे. तसेच भारतीय जनता पार्टी शाखा मोतीगव्हाण च्या वतीने रक्तदान शिबीर घेण्यात येणार आहे.

तरी परिसर व भागातील नागरिकांनी या सर्व रोगनिदान शिबिराचा व रक्तदान शिबिराचा लाभ घेऊन आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी असे आवाहन मोतीगव्हाण चे सरपंच तथा आयोजक विजय मोहिते पाटील यांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813